पुनर्वसन अधिनियमांतर्गत पात्र प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसित गावठाणामध्ये भोगवटादार वर्ग-२ म्हणून वाटप झालेल्या भुखंडाचे भोगवटादार वर्ग -१ मध्ये रुपांतर करण्याबाबत व सदर भुखंडाच्या हस्तांतरण व्यवहारावर असलेले निर्बंध ऊठविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : आरपीए-२०१८/प्र.क्र.१५७/र-१
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक : १८ मे, २०१८

<u>पहावे</u>: -१) महसूल व वन विभाग ,पत्र क्रं. आरपीए-२००७/३६०/प्र.क्र.३७१/र-१ दि.२८/११/२००७

<u>प्रस्तावना</u>:

पाटबंधारे प्रकल्पामुळे बाधित झालेल्या क्षेत्रातील बाधित व्यक्तींचे पुनर्वसन प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील संपादित जमिनीवर गावठाण निर्माण करुन करण्यात येते. पुनर्वसित गावठाणामध्ये बाधित कुटुंबांना घर बांधण्यासाठी पुनर्वसन अधिनियम १९९९ चे कलम १६ (१) (ब) नुसार बाधित व्यक्तीस त्यांनी पुर्वी धारण केलेल्या जमिनीच्या भोगवटा विषयक स्थितीसह नवीन गावठाणात भुखंड मंजुर करण्यात येतात. प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्यात आलेल्या भुखंडाची विक्री करण्याची परवानगी मिळण्याबाबत प्रकल्पग्रस्तांकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतर प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्यात आलेल्या भुखंडास १० वर्षाचा कालावधी झाला असल्यास त्यांच्याकडून कोणतीही रक्कम न घेता भुखंड विक्री परवानगी देण्यात येते. भुखंड वाटप होऊन १० वर्षाचा कालावधी पुर्ण व्हावयाचा असल्यास संबंधित प्रकल्पग्रस्तांकडून अनर्जित रक्कम भरुन त्यांना सुध्दा भुखंड विक्रीची परवानगी देण्यात येते. उपरोक्त प्रचलित पध्दतीने प्रकल्पग्रस्तास पुनर्वसित गावठाणामध्ये वाटप केलेले भुखंड विक्री करण्याची परवानगी देण्यास अनावश्यक विलंब होऊन सदर भुखंड विकून किंवा भोगवटा विषयक स्थिती बदलून तो हस्तांतरीत करण्यास संबंधित प्रकल्पग्रस्तास अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. प्रकल्पबाधित व्यक्तीचे विस्थापन झाल्यामुळे त्याचे पुनर्वसन करणे महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ नुसार बंधनकारक आहे. ज्या बाधित कुटुंबाचे संपादित मालकत्तेशिवाय त्याच गावात संपादन न होणारे स्वत:चे घर नाही, ज्या बाधित कुटुंबाचे जमिन संपादित झाल्यामुळे त्याच्या उदरनिर्वाहाचे एकमेव साधन हिरावले गेले आहे व सदर बाधित कुटुंब भुमिहीन झाले आहे, त्यांनाही पुनर्वसित गावठाणामध्ये घर बांधण्यासाठी भुखंड देणे बंधनकारक आहे. प्रकल्पामुळे / भुसंपादनामुळे विस्थापित झालेल्या बाधित व्यक्तीस पुनर्वसित गावठाणामध्ये वाटप केलेला भुखंड हा त्याच्या मालकीचा असणे आवश्यक आहे. पुनर्वसित गावठाणामध्ये भोगवटादार वर्ग-२ म्हणून वाटप झालेल्या भुखंडाचे भोगवटादार वर्ग -१ मध्ये रुपांतर करण्याबाबत व सदर भुखंडाच्या हस्तांतरण व्यवहारावर असलेले निर्बंध ऊठविण्याबाबत बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

ज्या पाटबंधारे प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या बाधित व्यक्तींची पुनर्वसन अधिनियम १९७६, १९८६ व १९९९ नुसार पात्रता तपासुन रहिवासी प्रयोजनार्थ भुखंडाचे वाटप करण्यात आले आहे, अशा भुखंडाचा भोगवटा कोणत्याही वर्गाचा असला तरीही पात्र प्रकल्पग्रस्त व्यक्तीस रहिवासी वापराकरिता वाटप झालेल्या सर्व भुखंडाचे रुपांतरण भोगवटादार वर्ग -१ मध्ये होईल. त्यासाठी त्यांना कोणतेही मुल्य भरण्याची आवश्यकता नाही. यापुढे उपरोक्त पुनर्वसन अधिनियमानुसार पात्र प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्यात येणारे रहिवासी प्रयोजनार्थ भुखंड हे वर्ग -१ म्हणून वाटप करण्यात यावेत. तसेच पुनर्वसित गावठाणामध्ये पुनर्वसन अधिनियम १९७६, १९८६ व १९९९ नुसार पात्रता तपासुन प्रकल्पबाधित व्यक्तीस वाटप झालेल्या भुखंडाचे हस्तांतरण किंवा खरेदी विक्री व्यवहारावर असलेले निर्बंध संपुष्टात येतील व शासनपत्र क्रमांक आरपीए-२००७/३६०/प्र.क्र.३७१/र-१, दि. २८/११/२००७ नुसार भुखंड विक्रीची परवानगी देण्यासाठी ठेवण्यात आलेल्या १० वर्षाच्या कालवधीची अट रद्द करण्यात येत आहे.

२. सदरचा शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक. २०१८०५१८१११९४७१६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Shivaji P Karwar

Digitally signed by Shivaji P Karwar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=46ec07554eac404147684ed8b27adc8a1c2a78fe8ffea3c9dd01377e25f76a36, cn=Shivaji P Karwar
Date: 2018.05.18 11:18:20 +05'30'

(शि.पां.कारवार)
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रत:

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा. मंत्री (म. व पु.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा. राज्यमंत्री (म. व पु.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५. मंत्रालयीन सर्व विभाग
६. सर्व विभागीय आयुक्त
७. सर्व जिल्हाधिकारी
८. सर्व उपायुक्त (पुनर्वसन), विभागीय आयुक्त कार्यालय
९. सर्व जिल्हा पुनर्वसन अधिकारी
१०. सर्व सह सचिव/उप सचिव/वि.का.अ./अवर सचिव/कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय , मंत्रालय, मुंबई, यांना प्रसिध्दीसाठी
१२. निवडनस्ती र-१ कार्यासन.